पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

प्रेस नोट

दिनांक :– ०१/१२/२०२२

## श्री. बच्च्न सिंह पोलीस अधिक्षक यांचे हस्ते सेवानिवृत्त पोलीस उपनिरिक्षक यांना निरोप सत्कार कार्यक्रम संपन्न.

मा. श्री.बच्च्न सिंह जिल्हा पोलीस अधिक्षक यानी आज रोजी वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरुन नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेल्या २ पोलीस उपनिरिक्षक यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र नाईक नेमणुक पोलीस स्टेशन मानोरा व महिला पोलीस उपनिरीक्षक सुषमा परांदे नेमणुक पोलीस स्टेशन मंगरुळपीर हे त्यांच्या सेवा काळात नियमित व शिस्तबध्द पणे कर्तव्य निभावुन निष्कलंक सेवा पुर्ण करुन दिनांक ३०/११/२२ रोजी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त पोलीस अधिक्षक कार्यालय येथे त्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. निरोप समारंभाकरीता ते त्यांच्या कुटुंबियासमवेत हजर होते.

महिला पोलीस उप निरीक्षक सुषमा परांदे हया सन १९८५ साली अकोला जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर भरती झाल्या असुन वाशिम जिल्हात सन १९९८ पासुन कार्यरत आहेत. त्यांनी त्यांचे सेवाकाळात पोस्टे वाशिम शहर,कारंजा शहर,फिंगर प्रिंट येथे कार्यरत होत्या. सन २०१७ साली पोउपनि पदावर पदोन्नती मिळाल्याने सेवानिवृत्तती पर्यंत पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे कार्यरत होत्या पोस्टे मंगरुळपीर येथे असताना त्यांनी लग्न करण्याच्या उद्देशाने पळुन गेलेल्या शिवणी येथील मुलीला पश्चिम बंगाल येथुन परत आणले व पालकांच्या ताब्यात दिले. त्यांनी पोलीस दलात एकुण ३८ वर्षे सेवा कार्यकाल पुर्ण केला.

तसेच पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र शामराव नाईक हे सन १९८५ साली पोलीस दलात भरती होऊन त्यांनी जिल्हा यवतमाळ,पुसद,दिग्रस येथे आपले कर्तव्य बजावले यवतमाळ येथे कार्यरत असताना त्यांनी बरेच नक्षलवादी तसेच बांगलादेशी घुसखोर यांना पकडुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली. तर वाशिम जिल्हयात त्यांनी पोलीस स्टेशन वाशिम शहर,रिसोड,मानोरा येथे डिटेक्शन अधिकारी म्हणुन कर्तव्य पार पाडुन पोलीस दलात ३६ वर्षे सेवाकार्यकाळ पुर्ण केला. त्यांनी दलातील नोकरी मुळे त्यांना त्यांच्या आप्तजनात तसेच समाजात एक मानाचे स्थान मिळाले होते असे त्यांनी त्यांचे मनोगत तसेच पोलीस खात्यात आलेले वेगवेगळे अनुभव सांगताना व्यक्त केले. पोलीस दलातुन निरोप घेताना दोन्ही अंमलदार हे भावुक झाले होते.

मा. पोलीस अधिक्षक यांनी त्यांनी त्यांच्या सेवाकाळात केलेल्या कामगिरीची प्रशंसा करुन त्यांना शाल श्रीफळ तसेच सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले. हजर असलेले अधिकारी यांनी तसेच सेवानिवृत्त अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मा. पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनात अपर पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे, पोलीस निरिक्षक श्री.सुनिल हुड पोलीस कल्याण शाखा हे कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचलन तसेच आभार प्रदर्शन पोलीस निरिक्षक श्री.सुनिल हुड पोलीस कल्याण शाखा वाशिम यांनी केले.

पोलीस निरीक्षक
**पोलीस कल्याण शाखा,वाशिम**